उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. आर. नजन यांचे मार्फत सुरुः-

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची शेती माझ्या घराच्या मागे आहे.हे म्हणणे खरे आहे की, मला पाणी आणण्यासाठी आरोपीच्या शेतात जावे लागत होते.हे म्हणणे खरे आहे की, मला स्वतंत्र लाईट बिल नाही.हे म्हणणे खरे आहे की, मला आकडे टाकुन आरोपीच्या शेतातुन लाईट घ्यावी लागत होती. हे म्हणणे खरे आहे की, आकडे टाकल्यानंतर लाईटचा धोका शेतीला व माणसांना असतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला आकडे टाकू नका असे म्हणत होता. घटनेच्या वेळी माझ्या कुटुंबात मी व माझ्या दोन मुली होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न झालेले आहे परंतु मी नांदत नसल्याने माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे माहेर लाखेफळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या एका मुलीचे लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी सासरे नांदत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या माहेरी माझी आई आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मोलमजुरी करून उदनिर्वाह करते. हे म्हणणे खरे आहे की, मला कामाला ०९.०० वाजेच्या दरम्यान जावे लागते व कामावरून यायला सायंकाळी ०६.०० वाजतात. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई गावात चर्चजवळ राहत होती. माझी आई कोणत्या मंदीराजवळ राहत होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई पुर्वीपासुन स्वतंत्र राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईच्या घराचे अंतर माझ्या घरापासुन २ ते ४ कि.मी. इतके आहे.

३. आरोपी क्र. १ व तिची सासू यांच्यामध्ये वाद आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व तिच्या सासुचे वाद झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ची सासू वय झाल्याने म्हातारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ची सासू आजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सखुबाई हिस अजुन एक मुलगा असुन तो मळ्यात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, सखुबाई ही मळ्यात कधी कधी अमोल सोबत राहते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या व अमोलच्या घराचे अंतर बरेच आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपींचे घर समोरासमोर नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणी कोणाच्या घरातुन पाहिले तर एकमेकांना दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व माझे कामाशिवाय एकमेकांच्या घरी जाणे-येणे नसते.

मध्यान्हामुळे उलटतपास तहकुब.

सही/-

(श्रीमती.ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- १७/०२/२०२६.

मध्यान्हानंतर उर्वरित उलटतपास शपथेवर सुरू.

४. दाताला मार लागल्याचे मी पोलीसांना सांगितले होते.हे म्हणणे खरे आहे की, मी दाताच्या दवाखान्यात गेले नाही.हे म्हणणे खरे नाही की, ''आरोपी क्र. २ आला व त्याने मला ओठावर काठी मारली व त्यामुळे माझा ओठ फुटला व रक्त आले'' हा मजकुर माझे पोलीसांकडील जबाबात नमुद नाही.हे म्हणणे खरे आहे की, माझे ओठ फुटल्याचे मी डॉक्टरांना सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ विरूद्ध मी यापूर्वीही एक केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसमध्ये माझे जाबजबाब झाले व सदर केसमधुन आरोपीस निर्दोष सोडण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या काठीने मला मारहाण केली ती काठी मी पोलीसांना दिलेली नाही तसेच दाखवलेली देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, डॉक्टरांना दाखविलेल्या जखमा जुन्या होत्या. माझ्यासोबत फिर्याद देण्यासाठी संजय सुखदान आले होते. संजय सुखदान हे माझे दिर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, लुकस गायकवाड हा माझ्याकडे नेहमी येत असतो व मला काही लागले तर कमी जास्त पाहत असतो.हे म्हणणे खरे आहे की, लुकसकडे मोटारसायकल आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला काही लागले तर मी लुकसच्या गाडीवरून बाहेर जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडीवरून पडले व मला जखम झाली.हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या शेजारी असल्यामुळे व आकडे टाकु म्हणाल्याचा मला राग आल्यामुळे मी खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते त्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला शिवीगाळ व मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा मला राग आला असल्याने मी त्यांच्याविरुध्द खोटी केस केली आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,
सही/-

(श्रीमती.ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- १७/०२/२०२६.